# स्वातंत्र्याचे फलित !

## डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

सुमारे १ महिन्यापूर्वी नवे सरकार सत्तेवर आले. हे सरकार अल्पमताचे आहे त्यामुळे एखाद्या प्रश्नावर विरोधी पक्षांनी रान उठवले तर ते पडू शकते. त्यामुळे त्याला सतत स्वतःचे अस्तित्व टिकविण्याची काळजी असणार. अशी काळजी असतानाच देशातील समस्या इतक्या गंभीर आहेत की त्या सोडवण्यास स्थिर सरकारची हमी असणे पुरेसे नाही. समस्यांचे आकलन त्यावरील उपाय शोधण्याची कल्पकता ते अंमलात आणण्यासाठी लागणारा खंबीरपणा व राष्ट्रहिताशिवाय कशाचीही तमा न बाळगण्याइतकी ध्येयनिष्ठ याबाबतीत आजचे नेते पूर्वीच्या नेत्यांपेक्षा काही वेगळे आहेत असे मानण्यास आज तरी काही आधार नाही. उलट ते त्या माळेतलेच मणी आहेत. याबद्दल निदान आज तरी काही संदेह नाही.

### समस्या निर्माण करण्याची किमया

आजच्या अगदी उलट १९४८ ची परिस्थिती होती. फाळणी नंतर भारतीय मुसलमानांना आपली चूक कळून आली होती. फाळणी मुळे आपला काहीच फायदा झाला नाही उलट भारतात आपण पूर्वीपेक्षाही अधिकच अल्पसंख्य झालो, आता आपल्याला हिंदूत मिसळून जाण्याखेरीज मार्ग नाही ही जाणीव मुसलमानांना होऊ लागली होती. बाकीच्या देशात एकात्मतेची भावना प्रबळ होती. अर्थव्यवस्था गरीबीची असली तरी युद्धाने बेचिराख झालेल्या जर्मनी व जपानपेक्षा वाईट नव्हती. पुढे प्रबळ झालेले चीन व पाकिस्तान हे शत्रूत्वाने वागणारे देश दुबळे होते. चीन यादवीने ग्रस्त होता व टीचभर पाकिस्तानचे सामर्थ्य भारताच्या तृतीयांशही नव्हते.

पण आमच्या नेत्यांचे नसलेल्या समस्या निर्माण करण्याचे सामर्थ्य अजब होते. त्यांनी तिबेट आमचा आहे अशी चीनने मागणी केल्यावरोबर तिबेटचा बळी देऊन चीनचे तर्पण केले. वस्तुतः त्यावेळी तिबेटमध्ये भारतीय सैन्य होते. तिबेटी लोकांनी भारतीयांना तिबेटमधून निघून जा असे म्हटले नव्हते. चीनी राज्याला ते परराज्य समजत होते व अमेरिकेला एवढेच नव्हे तर रशियाला देखील चीनने तिबेट काबीज करावां हे मान्य नव्हते. तिबेटच चीनचा झाल्यावर आपली तिबेटशी असलेली सीमाच बेकायदा झाली. कारण ती तिबेटने मानली होती. चीनने नव्हे, व तिबेट चीनचा भाग ठरल्यावर तिबेटचा आपल्या सीमा ठरवण्याचा अधिकारच अमान्य झाला.

### पाकिस्तान व चीन

यादवी युद्धाचा निकाल लागल्यानंतर चीनचे सामर्थ्य झपाट्याने वाढत होते. आम्ही मात्र ' विसाव्या शतकात कोणतेही राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करणार नाही ' असा मंत्र जपत सैनिकी सामर्थ्याकडे दुर्लक्ष केले. परिणामतः चीनने चुटकीसरशी आमच्या सैन्याचा धुव्वा उडविला.

केवळ चीनच नव्हे तर पाकिस्तानचेही लष्करी सामर्थ्य वाढत होते. भारताच्या तृतीयांश असलेले पाकिस्तानी सैन्य लवकरच महत्तेत व प्रहार सामर्थ्यांत भारताच्या बरोबरीचे झाले व आता पाकिस्तानावर स्वतःच्या बळाने विजय मिळवणे भारताला शक्य राहिले नाही. ७१ सालच्या लढाईत भारताने पाकिस्तानचा पराभव केला तो रशियाच्या मदतीने. तरी या लढाईत देखील पाकिस्तानने छाम्बप्रांत भारताकडून हिसकून घेतला व तो परत मागू नये म्हणून रशियानी भारतावर दडपण आणले. भारत पाकिस्तानला स्वसामर्थ्याने हरवू शकत नाही हे ६५ च्या लढाईत सिद्ध झाले. त्यावेळी भारत व पाकिस्तान यापैकी कुणालाच बाहेरच्या राष्ट्राने मदत केली नाही. म्हणजे हा एकास एक असाच मुकाबला होता. या युद्धात

दोघांचाही दारुगोळा संपल्यामुळे युद्ध थांबले तेव्हा आपले सैन्य पाकिस्तानच्या काही भागात होते त्याचप्रमाणे पाकिस्तानचेही काही सैन्य भारतात होते. भारतीय सेना चीनचा तर सोडाच पाकिस्तानचाही पराभव करण्याच्या स्थितीत नाही ही आंजची वस्तुस्थिती आहे.

### सगळीकडून लाथाच

आपल्या विदेश नीतीने चीन व पाकिस्तानच केवळ नव्हे तर ब्रह्मदेश व श्रीलंका यांचेही शत्रुत्व संपादन केले आहे. संपूर्ण काश्मीर घेऊन, कलम ३७० चा अडथळा बुद्धया निर्माण न करता तेथे हिंदूंची वस्ती बहुसंख्येने केली असती तर पाकिस्तानने काश्मीरचा नाद सोडूनच दिला असता व काश्मीरमध्ये अंतर्गत शांतता देखील नांदली असती. चीनने तिबेट मागितला तेव्हाच तिबेटी लोकांना चीनी राज्यास विरोध आहे. भारतीय राज्यास विरोध नाही म्हणून तिबेटचा बळी दिला जाणार नाही अशी कणखर भूमिका घेऊन संयुक्त राष्ट्रात फिर्याद नेली असती तर संयुक्त राष्ट्राची म्हणजे मुख्यतः अमेरिकेची सैनिक मदत सहज मिळाली असती व आपले सैन्य तिबेट मध्येच असल्यामुळे तिबेटसारख्या अभेद्य पहाडी मुलखावर ताबा मिळवण्याचा जवळजवळ अशक्य फंदात चीन पडला नसता.

ब्रह्मदेश व श्रीलंका यांनी तेथील भारतीय नागरिकांना टाळले तेव्हा व भारतातील ब्रह्मी व लंकेच्या नागरिकांना हाकलून प्रत्युत्तर दिले असते तर दुसरे देश भारतीय नागरिकांना हाकलून देण्यास धजावले नसते. आंज परिस्थिती अशी आहे की ब्रह्मदेश व श्रीलंके-प्रमाणेच आफ्रिकी हे देश फिजी इत्यादि देशांनी देखील भारतीयांना हाकून दिले आहे. भारतीयाला कुणीही लाथा माराव्या अशी आज भारतीयत्वाची प्रतिमा आहे.

### शेवटून पहिला

नेहरूनी भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढविली अशी सुशिक्षित वर्गाची विलक्षण समजूत आहे. ती किती निराधार आहे. हे वरील विवेचनावरून दिसून येईल. या समजुतीप्रमाणेच पंच-वार्षिक योजना ही नेहरूची देणगी आहे व या योजनांनी भारताची आर्थिक प्रगती झाली अशी दुसरी एक समजूत सुशिक्षितास प्रचलित आहे ती किती निराधार आहे हे सध्याच्या आर्थिक आपत्तीवरून स्पष्टच आहे. पण ही आपत्ति वि. प्र. सिंग व चंद्रशेखर यांच्या पंधरा महिन्याच्या कारकीर्दीमुळे आली असे सरकार म्हणत आहे. या आरोपावर उत्तर म्हणून १९७६ साली संयुक्त राष्ट्रांनी प्रकाशित केलेले १४५ देशाचे आकडे सादर करता येईल. या आकड्यानुसार भारताचा बालमृत्यु दर हजारी १३९, सरासरी आयुर्मान ५० प्रतिव्यक्ती राष्ट्रीय उत्पादन १३० अमेरिकन डॉलर्स एवढे होते. यापेक्षा कमी प्रगत चित्र दाखविणारे आकडे ज्या देशाची नावे आपण नेहमी ऐकतो त्यापैकी फक्त नेपाळ व इथीपिया यांचे आहेत. कमी असलेल्या अपरव्होल्टा वगैरे इतर सहा राष्ट्रांची नावे साधारणतः ऐकिवात नाहीत.

संयुक्त राष्ट्राच्या या आकड्यात निरक्षरता व बेकारी यांचा उल्लेख नाही. पण इतर आधारावरून पाहता या शतकाच्या शेवटी जगातील निरक्षरांच्या ५५ टक्के निरक्षर भारतात राहणार आहेत. या बाबतीत श्रीलंका देखील भारतापेक्षा बरचढ आहे. भारताची साक्षरता ५७ टक्के तर श्रीलंकेची ७८ टक्के आहे.

### अति लोकसंख्या हे कारण नाही

बेकारीच्या बाबतीत ही अशीच शोचनीय अवस्था आहे. पुढील तालिकेत बेकारीची वाढ दर्शविली आहे.

| वर्षे | बेकारांची संख्या |
|---|---|
| १९८१ | १ कोटी छप्पन्न लाख |
| १९८५ | २·५ कोटी |
| १९८६ | ३ कोटी १ लाख |

बेकारी बरोबरच दारिद्र्य. १९८७ साली दारिद्र्य रेषेखाली

३० टक्के लोक आहेत असे सरकारतर्फे सांगण्यात आले. पण जागतिक बँकेच्या मते १९८५ मध्ये ५५ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. यांचे मासिक उत्पन्न रु. ३६० पेक्षा कमी होते. अवघ्या दोन वर्षांत हे प्रमाण २५ टक्क्यांनी घटले यावर विश्वास ठेवणे कठिण आहे. अशा दावा सांगताना दारिद्र्याची व्याख्या सैल केलेली दिसते. अतिशय गरीब म्हणजे आफ्रिकेतील गरीबापेक्षा गरीब अशा लोकांची संख्या इकॉनॉमिष्टने ३३ टक्के सांगितली आहे.

आमची लोकसंख्या बेसुमार फुगल्यामुळे प्रगति करणे शक्य नाही अशी या नालायकीबद्दल सतत सांगण्यात येते. पण लोकसंख्येचा दबाव भारताइतकाच असलेल्या इतर देशाशी तुलना केली असता ही सबब किती पोकळ आहे हे दिसून येते.

औद्योगिक उत्पादनाची वाढ

| | | |
|---|---|---|
| भारत | ५.५ | टक्के |
| पाकिस्तान | १० | ,, |
| थायलॅण्ड | ११ | ,, |
| तायवान | १३ | ,, |
| दक्षिण कोरिया | १६ | ,, |

कृषि–उत्पादनातील वाढ

| | | |
|---|---|---|
| भारत | २ | टक्के |
| इण्डोनीसिया | ३.७ | ,, |
| मलेशिया | ४.७ | ,, |
| फिलीपीन्स | ४.६ | ,, |
| थायलॅण्ड | ४.५ | ,, |

साक्षरतेतील भाव

भारत २४ वरून ३६ टक्के

मलेशिया २३ वरून ६० टक्के

## ११ कोटि सरकारी नोकर

गरीबी आपल्या देशात ब्रिटिश काळापासून सततच राहिली आहे, त्यामुळे तो नवीन सरकार समोरचा नवीन प्रश्न नाही. नवीन

प्रश्न परकीय चलनाचा आहे. परकीय चलन मिळविण्यासाठी चंद्रशेखर सरकारला २० टन सोने परदेशी पाठवावे लागले. याच्या मोबदल्यात ४०० कोटि रुपये किंमतीचे म्हणजे २० कोटि डॉलर मिळाले. यापूर्वी १७० कोटि डॉलरचे कर्ज आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-कडून घेण्यात आले होते. कर्ज देण्यास योग्य कोण याचा क्रमांक ठरवताना आंतरराष्ट्रीय संस्थानी भारताची पत नेपाळ व बंगला देश यांच्यापेक्षा जास्त मानलेली नाही.

परकीय चलनाचा तुटवडा आमची निर्यातक्षमता फार तोकडी आहे याचा निदर्शक आहे. परदेशाला घ्यावासा वाटेल असा माल आपण निर्माण करू शकत नाही. हा याचा अर्थ आहे.

आमची सरकारी यंत्रणा अत्यंत खर्चाची आहे. सरकारी नोकरांची संख्या चालवण्याचा खर्च सरकारी उत्पन्नाच्या ६५ टक्के आहे. याच्या जोडीस राष्ट्रीयकृत उद्योग धंद्यात ३५०,००० कोटी रुपये गुंतलेले आहेत व ते बहुतेक तोट्यात चालतात. योजनावरील खर्चात १ रुपयाच्या कामासाठी १५० रुपये खर्च केले जातात असा अंदाज आहे. आमची उत्पादकता चीन व जपानच्या तुलनेने २० टक्के आहे. गेल्या पाच वर्षात सरकारी अंदाजपत्रकातील तूट सरासरी ४०,००० कोटि रुपये होती.

काही नित्योउपयोगी वस्तूच्या किमती कमी करण्यासाठी ६०, ००० कोटि रुपये अनुदान दिले जाते. अशा अनुदान दिले जाते. अशा अनुदानांचा फायदा गरिबांना मिळतो असा अनुभव नाही. उदाहरणार्थ दुधासाठी दिलेल्या अनुदानाचा उपयोग, गरीब मुलांचा दूध मिळण्यासाठी झालेला नाही. मोठ्या दुग्धशाळांनी या अनुदानाचा फायदा उचलून गवळ्यांचा धंदा मात्र बुडवला.

उद्योजकतेला उत्तेजन देण्यासाठी ५०८ कोटि रुपयांची तरतूद करण्यात आली होती. काही अर्थसंशोधक जेव्हा मागासलेल्या विभागातील लघुउद्योगांची पाहणी करायला गेले तेव्हा या लघु उद्योगांनी सांगितले की 'आम्हांला या ५०८ कोटि रुपयातला पैसाही मिळाला नाही. उलट मोठ्या कंपन्यांनी व राज्य सरकारांनी देखील आजची देयके बिले देखील अजून दिली नाहीत. ही बिले मिळत गेली तर आमचा धंदा नीट चालेल, आम्हाला अनुदानाची गरज नाही जास्त चौकशी करता अनुदानाचा हा पैसा अस्तित्वात नसलेल्या लघुउद्योगांच्या खाती दाखवला जातो असे दिसून आले.

योजनाउक खर्चासाठी, म्हणजे अनुत्पादक खर्चासाठी अंतर्गत व विदेशी कर्जे उभारण्याचा उपक्रम करण्यात आला. योजनाउक खर्चाचे प्रमाण दाखवणारी ही कर्जे १९८९-९० ८३ मध्ये १२ टक्के होती. या कर्जांवर द्याव्या लागणाऱ्या व्याजाचीच रक्कम १९९१ साली ५२२८५ कोटी रुपये होती. अनुत्पादक कामावर खर्च होणाऱ्या कर्जांतून इतके व्याज देणे हा अर्थव्यवस्थेवर मोठाच भार आहे.

१९९०–९१ या वर्षात विदेशी कर्ज ७८ ६००० दशलक्ष डॉलर होते. याचा अर्थ प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या डोक्यावर ७६०/- रुपये कर्ज आहे. आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३२ टक्के भाग या कर्जाचे व्याज देण्यात खर्च होतो.

या आर्थिक दुरवस्थेचे कारण काय? ही दुरवस्था अटळ नव्हती हे बहुतेक इतर सर्व राष्ट्रांनी आपल्यापेक्षा जास्त प्रगति केली यावरून स्पष्ट आहे. या दुरवस्थेचे मुख्य कारण गुंतवणुकीपासून करण्यात आल्या हे होय. भाकरा नांगल योजनेस जेवढा पैसा खर्च झाला तेवढ्या किंमतीचाही लाभ तिच्यातून मिळणार नाही असा काही अर्थशास्त्रांचा आरोप आहे. औद्योगीकरणांचा पाया पोलाद हा आहे असा ढोबळ नियम पाळून पोलादाच्या कारखान्यावर कोट्यावधी रुपये उधळण्यात आले. पण हे पोलाद सोन्यापेक्षाही महाग पडते व आपले उद्योगधंदे ते वापरण्याच्या स्थितीत नाहीत. वैज्ञानिक शिक्षणाने प्रगति होते अशा शुकपाठ करून २० ते २४ या वयोगटातील ८ टक्के मुलांना तज्ञ बनविले पण आमच्या

देशात त्यांच्या तत्वज्ञानाला मागणी नसल्यामुळे ते अमेरिकेत जाऊन स्थायिक होतात.

दुसरे कारण समाजवादी कल्पनेमुळे कर्मचारी अत्यंत अनुत्पादक झाले आहेत हे होय. कर्मचाऱ्यांना संरक्षण देणारे डझनावारी कायदे, भांडवलदार कर्मचाऱ्यांचे शोषण करतात, त्यांना लुटले की सगळीकडे समृद्धि नांदेल, या समजुतीने स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेवर घातलेली बंधने यामुळे आमच्या उद्योगांना पायात जोखंड घालून आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरावे लागते.

## गुन्हेगारांचे राज्य

अनुत्पादक उद्योगाबरोबरच कायदा व सुव्यवस्था यांची शोचनीय परिस्थिति हा अर्थव्यवस्थेवर मोठाच ताण आहे. दंगा धोप्यांनी वारंवार होणारी जीवित व वित्त हानि व बेसुमार फुगलेली पोलिस यंत्रणा याचा खर्च भयंकर आहे.

या देशात कायद्याची प्रतिष्ठाच उरली नाही याचे कारण देखील गेल्या ४४ वर्षांतील धोरणातच सापडते. मुसलमानांनी पाकिस्तान मागितले यात त्यांचे काहीच चुकले नाही. हिन्दू जातीयवादच त्याला कारण आहे असा सतत प्रचार करून फक्त हिन्दूंना ' मुसलमानाशी गुण्यागोविन्दाने नांदा ' म्हणून उपदेशाचे डोस पाजणे व व मुसलमानांना खास सवलती देणे या धोरणामुळे वेगळे वार केले की आपले या देशात लाड होतात. राष्ट्राचे अविभाज्य घटक म्हणून वागले तर आपल्याला कुत्राही विचारत नाही हे पाहिल्यावर नागालॅण्डचे बंड मोडून काढण्यात सैन्यात मोकळीक देण्यात आली नाही, देशाविरुद्ध बंड करणाऱ्या डेंगाला निर्वाचित सरकार बरखास्त करूनच मुख्यमंत्री करण्यात आले. उग्रवाद्यांना जास्त दंड न देता त्यांच्याशी वाटाघाटी करून त्यांना सार्वभौम सरकारचा दर्जा देण्यात आला, मी केंद्रसरकारचे कायदे मानत नाही असे म्हणणाऱ्या शेख अब्दुल्लाला मनधरणी करून पुनः मुख्य मंत्रीपदी स्थापित करण्यात आले. आपल्या अधिकाऱ्याचा खून करून पळून जाणाऱ्या सैनिकाविरूद्ध सैनिक कायद्याप्रमाणे कारवाई न करता त्यांच्या पुनर्वसनासाठी आटापिटा करण्यात आला. गुन्हे केल्याचेच जर सरकारी कृपा संपादन करता येत असेल तर गुन्ह्यांचे प्रमाण का वाढू नये!

दरडोई उत्पन्न, आयुर्मान साक्षरता याप्रमाणे स्वावलंबन हा राष्ट्रांच्या प्रगतीचा एक निकष आहे. परावलंबच अनेक प्रकारचे आहे. नैसर्गिक संपत्तीच्या अभावामुळे आलेले अरबी देशात तेलाखेरीज फारसे काही सापडत नाही त्यामुळे त्यांना पुष्कळसे पदार्थ बाहेरून आयात करणेच भाग आहे. दुसरे स्वेच्छेने पत्करलेले परावलंबन एखादी वस्तु आपल्या देशांत निर्माण करता येत असली तरी तिच्याऐवजी दुसरी एखादी वस्तु कमी खर्चात जात उत्पन्न मिळवून देणारी असेल तर ती आयात करणे, तिसरे परावलंब म्हणजे एखादी वस्तु जमविण्याइतके ज्ञान व बुद्धि आपल्याजवळचाही म्हणून ती आयात करणे. हे तिसरे परावलंबन देशाच्या मागासलेल्यापणाचे लक्षण आहे.

## परावलंबन

भारताचे परावलंबन हे तिसऱ्या प्रकारचे आहे. या परावलंबनाची सुरुवात आमच्या संविधानापासूनच झाली. भारत हे स्वतंत्र सार्वभौम राज्य राहील. असा संविधान समितीचा पहिला ठराव होता. तो रद्द करून या ठरावाला स्वतंत्र शब्द गाळण्यात आला व या गाळण्याचे समर्थन करताना पं. नेहरूंनी स्वतंत्र राहिल्यास या विशाल जगात आपण एकटे पडू असे उद्गार काढले. पिंजऱ्याचे दार उघडले तरी पारतंत्र्याचेच व्यसन लागलेला पोपट बाहेरच्या विशाल जगात आपण एकटे पडू म्हणून बाहेर न पडता पिंजऱ्यातच कुजत पडतो या मनोवृत्तीचेच हे निदर्शक होते. या ' सुधारित ' ठरावानुसार भारत ब्रिटिश साम्राज्यातच राहिला ब्रिटनचा राजा हाच पूर्वीप्रमाणे आमचा राजा ठरला. गणी एलिझाबेथने आपले संविधान पारित झाल्यानन्तर भारताच्या कारभारात कोणतीच ढवळाढवळ केली नाही हे खरे, पण अशी ढवळाढवळ करण्याचा कायद्या-

( पान ३२ पहा )

काय ठाऊक होतं, आयुष्याची बेरीज वजाबाकी नेहमी सारखीच असते ! '

' आपण त्यांना समजावलं तर त्या फेरविचार करणार नाही कां ! '

' नाही मंदार. एक तर आई पूर्ण विचार केल्याशिवाय कुठलाच निर्णय घेत नाही व एकदा घेतल्यावर बदलत नाही. आणि का म्हणून मी तिला तिचा निर्णय फिरवायला सांगावं ! इतकी वर्षं ती फक्त आमच्यासाठीच जगली. आता आयुष्याची संध्याकाळ तिच्या मनाप्रमाणे घालवण्याचा तिला हक्क नसावा काय ! '

' मी सहज सुचवलं. शेवटी आपलं आयुष्य कसं घालवायचं ह्याचा निर्णय ज्याचा त्यालाच घ्यायचा असतो. '

' लहानपणी आम्हाला कळत नव्हतं वाटायचं इतरांचे बाबा जसे त्यांच्याशी खेळतात, त्यांना फिरायला घेऊन जातात, तसे आमचे बाबा का घेऊन जात नाहीत ! भाराभार बक्षिसं मिळवून आणली तरी कौतुक का करीत नाहीत ! बाबा घरी आले की सारं चिडिचूप. आम्ही दोघं पुस्तकात डोकं घालायचो व आई स्वयंपाकघरात काम करायची. एवढंसं जरी चुकलं तरी ते अंगावर खेकसायचे किंवा फाडकन थोबाडीत ठेवून द्यायचे. '

' इतर मुलं सुटीत आजोळी जात. आम्हाला तेही ठाऊक नव्हतं. मी फक्त आजोबा आजीचा एक फोटो आईच्या ट्रंकेत पाहिला होता. तिने सांगितलं होतं की आजोबा गांधीजींचे भक्त होते. ते खादी वापरायचे. स्वतंत्रतेच्या लढ्यात त्यांनी भाग घेतला होता. कित्येकदा तुरुंगात गेले होते. एवढचं काय आमच्या आजीनेही सर्व चळवळीत त्यांच्या बरोबरीने भाग घेतला होता. माझ्या जन्मा-आधीच आजोबा गेले होते. आजीला भेटायची मला खूप उत्सुकता होती. पण बाबांनी आम्हाला तिच्याकडे पाठवलंच नाही कधी. मी तेरा चौदा वर्षांची असेन तेव्हा आजी गेली. आम्हा दोघांना शेजाऱ्यांच्या भरवशावर सोडून आई आजीच्या अंतिम दर्शनासाठी गेली. बाबा गेलेच नाहीत. परत आल्यावर आम्हा दोघांना जवळ घेऊन ती खूप रडली. आम्हीच तिचे अश्रू पुसले. त्यानंतर मात्र आम्ही कधीही तिच्या डोळ्यात अश्रू पाहिले नाहीत. '

' आम्हा दोघांनाही आता कळू लागलं होतं. न सांगताही आईचं दुःख थोडंफार समजत होतं. वाटायचं आई सारं निमूटपणे का सहन करते ! विरोध का करीत नाही ! एक दोनदा आम्ही आईच्या बाजूने बोलायचा प्रयत्न केला. आणखी सडकून मार खाल्ला. बाबांची घरातील वागणूक सोडली तर त्यांच्यात फारसं दोष काढण्यासारखं कांही नव्हत. ते व्यवस्थित कामधंदा करीत होते व समाजात एक प्रतिष्ठित नागरिक म्हणून वावरत होते. आईबाबांच का पटत नव्हतं, आमच्याशी ते का प्रेमाने वागत नव्हते, हे एक मोठं कोडं होतं.

' ते उलगडलं दोन वर्षांपूर्वी. अगदी अनपेक्षितपणे आमची आई रोज डायरी लिहीत असे. एक दिवस कामाच्या घाईगर्दीत टेबलाच्या खणात टाकण्याऐवजी ती बाहेरच ठेवून आई बाहेर निघून गेली. सकाळची झाडझुड करताना ती माझ्या हातात पडली. दुसऱ्याची रोजनिशी वाचणं पाप आहे हे ठाऊक असूनही ती वाचण्याची उत्सुकता मला दडपून ठेवता येईना. मी माझ्या खोलीला आतून कडी घातली व वाचण्यास सुरुवात केली. त्या डायरीत काय नव्हतं ! आईच्या बालपणीच्या आठवणी होत्या. गांधीजींनी देशाला केलेल्या आवाहनानुसार लाखो लोकांनी होमकुंडात घेतलेल्या उड्या, तरूण तरूणींनी काढलेल्या प्रभात फेऱ्या, बंद पाडलेली शाळा कॉलेज लाठ्या खाऊनही असलेला सळसळणारा उत्साह. आधी आजोबांचं मग आजीचं तुरुंगात जाणं. अर्धवट राहिलेलं शिक्षण. वाट्याला आलेला एकेलेपणा या साऱ्याचं वर्णन होतं. पण तरीही डोळ्यावर देशासाठी केलेल्या त्यागाची धुंदी होती.

' ४३, ४४ चा काळ. महायुद्धामुळे कडाडलेले भाव. सहा महिन्यानंतर आजोबा तुरुंगातून सुटून आलेले. कुणीतरी बाबांना सल्ला दिला, ' तुम्हा दोघाचाही भरवसा नाही. मुलगी मोलकरणीच्या सोबतीने एकटी राहते. त्यापेक्षा तिचं लग्न कां करून टाकत नाही ! '

बाबांना सल्ला पटला. त्याबरोबर त्या हितचिंतकांनी दोन चार स्थळही सुचवली. त्यापैकीच एक आमच्या बाबाचं. श्रीधरपंत

[ स्वातंत्र्याचे फलित पान.... २९ वरून ]

प्रमाणे तिला पूर्ण अधिकार आहे, भारत हे कायद्याप्रमाणे स्वतंत्र राष्ट्र नाहीच.

स्वातंत्र्याला भिणाऱ्या याच मनोवृत्तीचे प्रदर्शन पुढे इंग्रजीच्या दाखल्याच्या रूपाने झाले. हिन्दी ही केन्द्र सरकारची भाषा असावी असा संविधान समितीचा सर्वानुमते ठराव होऊन ही केन्द्रभाषा म्हणून इंग्रजीचे उच्चाटन होण्याच्याऐवजी पाळण्यातल्या मुलाशी देखील इंग्रजी बोलण्याची प्रथा सुरू झाली. भाषिक प्रांता-साठी रक्तपात होऊनही प्रांतीय भाषांना राज्य भाषा बनविण्याच्या ज्या मूळ उद्देशाने भाषिक प्रांत बनवण्यात आले त्या मूळ उद्देशालाच हरताल फासून सारा कारभार व शिक्षण इंग्रजीतच सुरू राहिले एवढेच नव्हे तर इंग्रजी राज्यात कधी नव्हते एवढे इंग्रजीचे प्रस्थ वाढले.

भाषेच्या बाबतीत प्रकट झालेली ही दास्यवृत्ति सर्वच क्षेत्रात प्रकट झाली. आम्हाला स्वतःचा दारूगोळा करता येत नाही व दुसऱ्याकडून घेतलेला दारूगोळा संपला म्हणून ६५ च्या लढाईत आम्हाला शस्त्रन्यास करावा लागला. आमच्या रक्षाविज्ञान खात्याचा एकही प्रकल्प पुरा झाला नाही. आम्हाला १६०० अश्वशक्तीचे ऊर्जक एंजिन--करता येत नाही म्हणजे नॅट विमाने भारतात बन-तात या दाव्याला विशेष अर्थ नाही. आम्हांला तोफा देखील करता येत नाहीत म्हणूनच बोफोर्स तोफांचे प्रकरण झाले, आम्हाला तोफा करता येतात पण सैन्याला फार थोड्या तोफा लागतात, त्या विकत न घेता त्यांचा कारखाना काढणे किफायतशीर पडणार नाही. हा युक्तिवाद खरा मानला तर शस्त्रास्त्राबद्दलचे स्वावलंबन या उद्दिष्टालाच काही अर्थ उरत नाही. कारण युद्ध सुरू नसले तर सगळ्याच शस्त्रांची गरज फार माफक असते. खरी गोष्ट अशी आहे की स्वतःच्या पायावर उभे राहण्याची आमच्यात कुवत वा इच्छाही नाही. राणी एलिझाबेथ व इंग्रजी भाषा यांच्याशिवाय या राष्ट्राला पोरके झाल्यासारखे वाटते त्याच्याकडून दुसरी अपेक्षा करता येत नाही.

